श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

सप्टेंबर २०२३ | वर्ष – ११ अंक – ९ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८

## बी.के.एल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा




*डावीकडून : डॉ. अविनाश बोरकर, डॉ. योगेंद्र शेळके, डॉ. जयश्री जानकर, डॉ. सुनीता पाटील, वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील , डॉ. अरविंद यादव, डीन डॉ. मानसिंगराव घाटगे, डॉ. शिवाजी पाटील, डॉ. अनिल कुरणे, डॉ. शशिकांत धुमाळे, डॉ. गजानन वेल्हाळ, डॉ. अविनाश वाघमोडे, डॉ. संग्राम दाभोळकर, डॉ. प्रशांत मूल्या*

बी.के.एल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षक दिन दि. ५ सप्टेंबर २०२३ रोजी साजरा करण्यात आला.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून वैद्यकीय क्षिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरता अनेक मार्गदर्शनपर गोष्टी प्राध्यापकांनी प्रस्तुत केल्या. उत्तम शिक्षक आणि उत्तम विद्यार्थी होण्याकरता आणि त्याचबरोबर एक उत्तम डॉक्टर होण्याकरता कोणते गुण आत्मसात केले पाहिजेत ह्याचे मार्गदर्शन प्रेझेंटेशनद्वारे करण्यात आले.

शिक्षकदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात औषधशास्त्र विभागाच्या प्रमुख प्राध्यापिका डॉ. सुनीता पाटील यांनी विद्यार्थी व कर्मचारी यांना संबोधित करताना शिक्षकांचा देशासाठी सुजाण नागरिक निर्माण करण्यासाठी महत्त्वाचा वाटा, चांगल्या शिक्षकातील गुण, वैद्यकीय शिक्षणक्षेत्रातील उत्क्रांती व त्यासाठी नवीन टेक्नॉलॉजीचा उपयोग व भविष्यातील शिक्षणक्षेत्राबद्दल माहिती सांगितली.

शिक्षकदिनानिमित्त बोलताना डॉ. गजानन वेल्हाळ यांनी शिक्षकांप्रती कायम शिकत राहण्याची वृत्ती असावी आणि प्रथम विद्यार्थी, नंतर शिक्षक आणि पुन्हा नवीन पिढीचे शिकणारे विद्यार्थी अशी शृंखला कायम राबवली जावी या मुद्यांवर विशेष भर दिला, व्यक्ती शाळा, विद्यालयांमध्ये शिकवणारी लौकिकार्थाने 'शिक्षक' म्हणून ओळखली जाणारी व्यक्ती असो किंवा व्यवहारमध्ये आपल्याला शिक्षणाचे महत्त्व पटविणारी, जोपासणारी इतर व्यक्ती असो, शिक्षक म्हणून दोघांचेही महत्त्व आहे आणि त्यांच्याप्रति आदरभाव व्यक्त करण्यासाठी शिक्षक दिनाचे महत्त्व आहे असे ते म्हणाले. आपल्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव टाकणाऱ्या सर्वांची आठवण आणि त्यांच्याप्रति आदरभाव व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे शिक्षक दिन. या दिवसाचे औचित्य साधून 'इंदुमती मल्टिपर्पज फाउंडेशन, कोल्हापूर'तर्फे सर्वोत्कृष्ट शिक्षक या श्रेणीअंतर्गत प्राध्यापकांना सन्मानित करण्यात आले.

'संशोधक आणि उत्कृष्ट चिकित्सक' स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन डॉ. सूर्यकांत इंगळे – बालरोगतज्ज्ञ, डॉ. अविनाश वाघमोडे – फोरेन्सिक मेडिसिन, डॉ. सुनीता पाटील – औषध शास्त्र, डॉ. प्रशांत मुल्या – शरीरशास्त्र यांना आणि उत्कृष्ट संशोधक पुरस्काराचे मानकरी म्हणून डॉ. अविनाश बोरकर, डॉ. योगेंद्र

शेळके, डॉ. जयश्री जानकर यांना गौरविण्यात आले. सर्वोत्कृष्ट क्लिनिशिअन म्हणून डॉ. संग्राम दाभोलकर आणि डॉ. अनिल कुरणे याना पुरस्कार देण्यात आला. पुरस्कारांचे वितरण 'इंदुमती मल्टिपर्पज फाऊंडेशन'चे संस्थापक अध्यक्ष शशिकांत धुमाळे आणि वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील, डीन डॉ. मानसिंगराव घाटगे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

# 'स्तनपान नव्हे – अमृतपान' सप्ताह वालावलकर महाविद्यालयातर्फे साजरा




*'जागतिक स्तनपान सप्ताहा'निमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी डॉक्टर्स, परिचारिका आणि माता-मुले*

'जागतिक स्तनपान सप्ताह' हा दरवर्षी ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात साजरा केला जातो. आठवडाभर चालणारा हा सप्ताह आई आणि मूल दोघांसाठीही खूप महत्त्वाचा आहे. बाळासाठी आणि आईसाठी स्तनपान किती महत्त्वाचे आहे याविषयी संपूर्ण जगामध्ये जनजागृती करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

नियमित स्तनपान केल्याने बाळाचे वजन वाढते आणि त्याला जंतुसंसर्ग, मोठेपणी होणारे कर्करोग, मधुमेह अशा अनेक आजारांपासून संरक्षण देखील मिळते. शिवाय आईचे दूध पचायलाही हलके असते.

कम्युनिटी मेडिसिन विभागातर्फे डॉ. गजानन वेल्हाळ, डॉ. रविकिरण कामथे (सहअध्यापक), एम.बी.बी.एस.चे विद्यार्थी, नर्सेस यांचा या उपक्रमाला भरघोस प्रतिसाद मिळाला. बालरोग विभागातर्फे डॉ. अनिल कुरणे, डॉ. शिवाजी पाटील, डॉ. अविनाश लूकडे, डॉ. वाणी आणि पी. जी. रेसिडेंट डॉ. प्रचेता गुप्ता आणि इतर कर्मचारी यांनी जागतिक स्तनपान सप्ताहात उत्साहात सहभागी होऊन मातांना मोलाचे मार्गदर्शन केले.



*'जागतिक स्तनपान सप्ताहा'निमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी डॉक्टर्स, परिचारिका आणि माता-मुले*



*'जागतिक स्तनपान सप्ताह'निमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी डॉक्टर्स, परिचारिका आणि माता-मुले*

# राष्ट्रीय पोषण आठवडा २०२३



*अँथ्रोपॉमेट्रिक मापनासंदर्भात कार्यशाळा : उजवीकडून - डॉ. शर्वरी कलंत्रे, डॉ. उल्का बाणावली आणि डॉ. वीणा यार्दी (उजवीकडून चौथ्या) अँथ्रोपॉमेट्रिक मापन घेताना*

दि. ०१/०९/२०२३ रोजी राष्ट्रीय पोषण आठवडा साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मार्गदर्शन करण्यासाठी मुंबईतून आहारतज्ज्ञ डॉ. उल्का बाणावली, डॉ. वीणा यार्दी तसेच डॉ. शर्वरी कलंत्रे या उपस्थित होत्या.

पहिल्या दिवशी वालावलकर हॉस्पिटलमधील नर्सिंग स्टाफ, कोहार्ट स्टाफकरिता अँथ्रोपॉमेट्रिक मापनासंदर्भात कार्यशाळा घेण्यात आली. यात वजन, उंची, डोके व दंडाचा घेर, कमरेचा घेर व स्कीन फोल्ड्स यांच्या मोजणीकरिता मार्गदर्शन करण्यात आले.

दुसऱ्या दिवशी हाच विषय प्रात्यक्षिकांद्वारे समजावून सांगण्यात आला. या कार्यशाळेचा लाभ हॉस्पिटल मधील विविध विभागातील सुमारे ४० नर्सेसनी घेतला.

याच वेळी आजूबाजूच्या परिसरातून आलेल्या किशोरवयीन मुलींची तीन दिवसीय निवासी कार्यशाळा घेण्यात आली. यात मुलींना पौष्टिक आहार, नियमित व्यायाम व व्यक्तिमत्त्व विकास या विषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. तसेच योगा व मंगळागौरीचे खेळ, समतोल आहार, पाककृती आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.




*राष्ट्रीय पोषण दिनानिमित्त किशोरवयीन मुलींची तीन दिवसीय निवासी कार्यशाळा*

# वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी बालरोग प्रश्नमंजुषा स्पर्धा



*प्रश्न-मंजुषेत सहभागी प्रध्यापक आणि विद्यार्थी*

दि. १० सप्टेंबर २०२३ रोजी बालरोग विभागातर्फे डॉक्टर सूर्यकांत इंगळे, डॉ. अनिल कुरणे, डॉक्टर सहस्रबुद्धे, डॉ. अविनाश लुकडे, डॉ. शिवाजी पाटील आणि इतर सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली एका प्रश्न-मंजुषेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विजेते विद्यार्थी आशुतोष लकडे, श्रीपाद मोरेवर आणि अश्विनी वर्पे यांना प्रशस्तिपत्रक तसेच इतर सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# एन्डोस्कोपिक स्पाइन सर्जरी कार्यशाळा संपन्न




*एन्डोस्कोपिक स्पाइन सर्जरी कार्यशाळा - सहभागी डॉक्टर्सना प्रमाणपत्र देताना डॉ. सतीशचंद्र गोरे*

दुर्बिणीद्वारे मणक्यातील दाब देणारी चकती काढण्याची कार्यशाळा सुप्रसिद्ध स्पाइन सर्जन डॉक्टर सतीशचंद्र गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.

ह्या कार्यशाळेत व्याख्यानांबरोबर प्रत्यक्ष शस्त्रक्रिया आणि त्यापूर्वी सर्जनचे कौशल्य वाढावे म्हणून कॅडेव्हरीक एंडोस्कोपीवरही भर दिला गेला. हे नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान आत्मसात करण्याकरिता अहमदाबाद, दिल्ली, चेन्नई, केरळ अशा भारताच्या कानाकोपऱ्यातून स्पाईन सर्जन्स आणि न्यूरोसर्जन्सनी आपली उपस्थिती लावली. एक आठवडाभर चाललेल्या ह्या कार्यशाळेत प्रामुख्याने शरीरशास्त्र, रेडिऑलॉजी आणि अस्थिरोग ह्या तीन विभागांचा समन्वय साधून सहभागी होणाऱ्या डॉक्टर्सचे कौशल्य वाढवण्याचे प्रयत्न केले गेले. ह्यात सुप्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ आणि एंडोस्कोपिक स्पाइन सर्जन डॉ. सतीशचंद्र गोरे यांचा सिंहाचा वाट होता. त्याचबरोबर डॉ. नेताजी पाटील - रेडिओलॉजिस्ट, डॉ. सुनील नाडकर्णी - स्पाइन सर्जन, डॉ. ओंकार सुदामे - स्पाइन सर्जन, डॉ. प्रशांत मूल्या, प्राध्यापक (शरीरशास्त्र विभागप्रमुख) यांनी काम पाहिले. होतकरू इंटर्नसनी तसेच डॉक्टर्सनी हिरिरीने सहभाग घेतला.



*एन्डोस्कोपिक स्पाइन सर्जरी कार्यशाळा - सहभागी डॉक्टर्ससमवेत डॉ. सतीशचंद्र गोरे*

# वालावलकर रुग्णालयात मेंदूरोग तज्ज्ञ उपलब्ध




*डावीकडून: पाचवे - मनीष साळुंखे, सहावे- डॉ. सागर ओक, सातव्या - डॉ. सुवर्णा पाटील आणि अन्य सहकारी*

लकवा, अर्धशिशी, मेंदूतील आणि रक्तवाहिन्यांतील दोष, गुठळ्या, रक्तस्राव, आकडी, पार्किंसोनिझम अशा अनेक आजारांवर आता तज्ज्ञ डॉक्टरांकडून विशेष उपचार वालावलकर रुग्णालयात होणार आहेत. इतकेच नव्हे तर जर रुग्णामध्ये पॅरालिसिसची लक्षणे दिसू लागताच दोन तासात रुग्णालयात दाखल केले तर विशेष इंजेक्शन्स देऊन पॅरालिसिस पूर्णपणे रोखता येणार आहे. याशिवाय मेंदूतील रक्त -वाहिनीत अडथळा असेल ती गुठळीसुद्धा 'अँजिओग्राफी' आणि 'एम्बोलॅक्टोमी' करून काढता येणार आहे. या विशेष उपचाराकरिता मुंबईतील 'नानावटी मॅक्स सुपरस्पेशॅलिटी रुग्णालया'तील सुप्रसिद्ध न्यूरॉलॉजिस्ट डॉक्टर सागर ओक आणि डॉ. मनीष साळुंखे यांनी दि. १० सप्टेंबर रोजी डेरवणला भेट देऊन ३० रुग्णांची तपासणी केली. त्यांच्या कौशल्याचा लाभ ह्या रुग्णांना मिळत आहे.

दर महिन्यातून एकदा डेरवणला भेट देऊन रुग्णसेवा करण्याचा त्यांचा मानस आहे. दि. १ ऑक्टोबर २३ रोजी उपस्थित राहून ते रुग्ण तपासणी करणार आहेत. त्याकरिता रुग्णांनी आपली आगाऊ नावनोंदणी करावी.

# श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर ट्रस्टतर्फे शेतकऱ्यांना गोधनाचे मोफत वाटप

डेरवण येथे श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर समाधिमंदिरात श्रीसहजानंदसरस्वती महाराजांनी एक उत्तम गोशाळा सुरू केलेली आहे. या गोशाळेत गायी-बैलांची उत्तम निगा राखून त्यांचे पालन केले जाते. मंदिरासाठी गाईचे दुध आणि शेती नांगरणीसाठी बैल, शेणखत यांचा पुरेसा पुरवठा त्यातून होतो. गाईबैलांची संख्या जरुरीपेक्षा जास्त झाली की अतिरिक्त जनावरांचे (पाडे-पाड्या) परिसरातील गरजू शेतकऱ्यांना विनामुल्य वाटप केले जाते. यासाठी एकच अट आहे की त्या शेतकऱ्यांनी इमाने-इतबारे जनावरांची निगा राखायची आणि त्यांना विकायचे नाही. गेल्या काही दिवसात याप्रमाणे सहा पाडे आणि चौदा पाड्या डेरवण परिसरातील (चिपळूण तालुका) शेतकऱ्यांना विनामुल्य देण्यात आल्या.

त्याचा तपशील असा -

१. श्री. विजय मांडवकर, ढोक्रवली - ३ पाड्या;
२. श्री. प्रशांत महाडीक, ढोक्रवली - २ पाडे, १ पाडी;
३.श्री. वैभव लाड, ढाकमोली - २ पाडे;
४.श्री.सिद्धेश लाड, ढाकमोली - २ पाड्या;
५. श्री. कुणाल महाडीक, पालवण - १ पाडा, २ पाड्या;
६.श्री. दत्ता गुजर, कोसबी - २ पाड्या;
७.श्री. ओंकार भूवड, डेरवण - १ पाडी:
८.श्री. धीरज गुजर, कोसबी - १ पाडी;
९.श्री. आबा सावंत, तोंडली-पिलवली - २ पाड्या;
१०.श्री. अमर राजेशिर्के, कुडप - १ पाडा

# ९ वी बी.के.एल. वालावलकर क्रॉस कंट्री स्पर्धा जल्लोषात संपन्न



*पोलीस उपअधीक्षक श्री.राजेंद्रकुमार राजमाने स्पर्धा सुरवात करताना*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित क्रीडासंकुलात आयोजित नववी भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर क्रॉसकंट्री स्पर्धा उत्साही वातावरणात पार पडली. ही स्पर्धा १२ सप्टेंबर रोजी १२ / १४ / १६ आणि १८ वयोगटातील मुले व मुली या दोन विभागात झाली. प्रत्येक सहभागी खेळाडूंना टी-शर्ट वितरीत करण्यात आले होते. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी चिपळूण पोलीस उपअधीक्षक राजेंद्रकुमार राजमाने, सावर्डे पोलीस निरीक्षक जयंत गायकवाड, शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त जगदीश नानजकर,

स्पर्धेचे प्रायोजक रोहित एंटरप्रायझेसचे प्रतिनिधी केदार काळे, डॉ. नेताजी पाटील, रत्नागिरी जिल्हा संघटनेचे संदीप तावडे, राज्य क्रीडा मार्गदर्शक सचिन मांडवकर, शैक्षणिक संचालिका सौ. शरयू यशवंतराव आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेसाठी माणगाव (रायगड), अहमदनगर, सोलापूर, पालघर येथूनही स्पर्धक सहभागी झाले होते.

स्पर्धेचा निकाल (प्रथम पाच क्रमांक अनुक्रमे)- १२ वर्षांखालील मुलांमध्ये (२ कि.मी.)- श्लोक कदम, अवधूत सुर्वे, प्रथमेश तांबे, रवी कश्यप, मुलींमध्ये (२ कि.मी. ) - इरा चिकणे, रुद्रा शिवगण, अन्वी काळे, श्रेया देशमुख, हर्षदा जोशी.

१४ वर्षांखालील मुले (३ कि.मी.)- शंतनू नवघणे, साईप्रसाद वराडकर, ओम गाढवे, प्रणित खळे, प्रांजळ आंबेडे. मुली (२ कि.मी.)- हुमेरा सय्यद, मयुरी चव्हाण, अनुजा पवार, शुभांगी हंबीर, भक्ती शिगवण .

१६ वर्षांखालील मुले (४ कि.मी..)- सिद्धनाथ जगताप, करण कदम, समृद्ध पै, करण चौधरी, सुजल जोशी. मुली (३ कि.मी.) मैथिली कुरणे, श्रेय धानवे, आरोही पालखडे, सलोनी बागवे, समीक्षा जयस्वाल.

१८ वर्षांखालील मुले (६ कि.मी.)- स्वराज जोशी, अर्जुन लवाटे, हृषीकेश कदम, सुयश खरात, श्रेयस ओकटे. मुली (४ कि.मी.)- श्रावणी वालावलकर, सृष्टी जड्याळ, श्रावणी चिवलकर, साक्षी पुनवत, अंकिता शिंदे.

स्पर्धेतील विविध गटातील प्रथम पाच क्रमांकाच्या खेळाडूंना रु. ५५ हजारांची रोख पारितोषिकेह, पदके आणि प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. आठ वयोगटासाठी झालेल्या या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ डॉ. ज्योती अय्यर, रमाकांत सकपाळ, समीर कालेकर, प्रवीणकुमार आवळे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.




*क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर पोलीस उपअधीक्षक श्री. राजेंद्रकुमार राजमाने यांचे स्वागत करतांना*

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**

श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731

ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com



*श्री. योगेश विचारे सावर्डे पोलीस निरीक्षक श्री. जयंत गायकवाड यांचे स्वागत*



*१४ वर्षांखालील मुलांच्या गटाचे पारितोषिक वितरण करतांना श्री. संदीप तावडे आणि श्री. समीर कालेकर*



१८ वर्षांखालील वयोगटाचे पारितोषिक वितरण करतांना कबड्डी संघटक श्री. रमाकांत सपकाळ



१६ वर्षांखालील मुलींच्या पारितोषिक वितरणप्रसंगी श्री. केदार काळे आणि श्री. श्रीकांत पराडकर



*१६ वर्षांखालील मुलांच्या पारितोषिक वितरण प्रसंगी सौ. शरयू यशवंतराव*



*दोन कि.मी. धावमार्गावरील स्पर्धा*

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६३९ येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील - ९९२१२ ५१६९५,
उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव - ९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर - ९५८८४ ७९२२०